# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## गट-क संवर्गातील सरळसेवेने रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात (२०१८)

जिल्हा हिवताप अधिकारी,**गडचिरोली** यांच्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील खालील नमूद रिक्त पदे भरण्याकरीता खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडुन विहित नमुन्यात मे. महापरीक्षा पोर्टल यांच्या मार्फत अर्ज मागविण्यांत येत आहेत. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने दि.२६/२/२०१९ रात्री १०.०० वाजता पासून ते दि.१८/३/२०१९ रात्री ११.५९ वाजेपर्यत स्विकारण्यात येतील. तसेच टपालाव्दारे/हस्तबटवडयाने अथवा कुरीअरने पाठविलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

**अ) पदाचे नाव :- बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (पुरुष) (५० टक्के)**
**बिगर अनुसूचीत क्षेत्रातील पदे (नॉनपेसा)** वेतनश्रेणी :५२००-२०२०० ग्रेड वेतन(२४००)

| अ.क्र. | भरावयाचे एकुण पद संख्या | समांतर आरक्षण | | | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ई.डब्लु.एस | खुला | एकूण |
| १ | १२ | सर्वसाधारण | ० | २ | ० | ० | १ | ० | १ | १ | २ | १ | ३ | ११ |
| | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | अपंग | | | | | | | | | | | | ० |
| एकुण | | | ० | २ | ० | ० | १ | ० | १ | १ | २ | १ | ४ | १२ |

**पदाचे नाव :- बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (पुरुष) (५० टक्के)**
**अनुसूचीत क्षेत्रातील पदे (पेसा)** वेतनश्रेणी :५२००-२०२०० ग्रेड वेतन(२४००)

| अ.क्र. | भरावयाचे एकुण पद संख्या | समांतर आरक्षण | | | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ई.डब्लु.एस | खुला | एकूण |
| १ | ४५ | सर्वसाधारण | ० | २८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २८ |
| | | माजी सैनिक | ० | ७ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७ |
| | | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | खेळाडु | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | | प्रकल्पग्रस्त | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | | भुकंपग्रस्त | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | अंशकालीन | ० | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ |
| | | अपंग | एकूण १ पद दिव्यांसाठी राखीव | | | | | | | | | | | |
| एकुण | | | ० | ४५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४५ |

ब) पदाचे नाव :- बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (पुरुष) (४० टक्के)
बिगर अनुसूचीत क्षेत्रातील पदे (नॉनपेसा) वेतनश्रेणी :५२००-२०२०० ग्रेड वेतन(२४००)

| अ. क्र. | भरावयाचे एकुण पद संख्या | समांतर आरक्षण | | | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ई.डब्लु. एस | खुला | एकूण |
| १ | ९ | सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ४ | ७ |
| | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | अपंग | | | | | | | | | | | | ० |
| एकुण | | | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ६ | ९ |

पदाचे नाव :- बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (पुरुष) (४० टक्के)
अनुसूचीत क्षेत्रातील पदे (पेसा) वेतनश्रेणी :५२००-२०२०० ग्रेड वेतन(२४००)

| अ. क्र. | भरावयाचे एकुण पद संख्या | समांतर आरक्षण | | | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ई.डब्लु. एस | खुला | एकूण |
| १ | २३ | सर्वसाधारण | ० | १६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १६ |
| | | माजी सैनिक | ० | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| | | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | खेळाडु | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | प्रकल्पग्रस्त | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | अंशकालीन | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | | अपंग | एकूण १ पद दिव्यांसाठी राखीव | | | | | | | | | | | |
| एकुण | | | ० | २३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २३ |

टिप :

- उपरोक्त दर्शविलेल्या पदसंख्येमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.
- स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशःत बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना राहतील. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.
- उक्त संवर्गातील रिक्त पदांमध्ये आंतरमंडळ बदली, पदांचा आढावा, आंतरमंडळ समायोजन इत्यादी कारणांमुळे पदसंख्येत व आरक्षण/समांतर आरक्षण बदल होण्याची शक्यता आहे.
- अपंगांची पदे भरतांना सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दिनांक १९/०३/२०१० मधील सुचनेनूसार अपंगांची पदे सामाजिक प्रवर्गात दर्शविण्यात आलेली नाहीत. मात्र गुणवत्तेनूसार निवड झालेला उमेदवार ते ज्या सामाजिक प्रवर्गात असतील त्या सामाजिक प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेण्यात येईल.

अशा परिस्थितीत जेवढी अपंगांची पदे भरण्यात येतील तेवढी पदे त्या सामाजिक आरक्षणाव्यतीरीक्त पदांमधून कमी करण्यात येतील.

- उपरोक्त पदसंख्येमध्ये दि.३१ डिसेंबर २०१९ पर्यत नियत वयोमान सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांचा समावेश आहे. त्यामुळे अशा पदावर निवड झालेल्या उमेदवारांना सदर पद सेवानिवृत्तीने रिक्त झाल्यानंतरच नियुक्ती आदेश देण्यात येतील.

## २. शैक्षणिक अर्हता व अनुभव

| अ. क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| 26 | बहुउददेशिय आरोग्य कर्मचारी ४०% | ज्यांनी विज्ञान विषयासह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे. |
| 27 | बहुउददेशिय आरोग्य कर्मचारी ५०% | i) ज्यांनी विज्ञान विषयासह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे. आणि<br>ii) राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून किमान ९० दिवस काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र आवश्यक. |

टिप-

१) बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (पुरुष)या संवर्गातील ५० टक्के कोटयामधून निवड झालेल्या उमेदवारांची अनुभव प्रमाणपत्र पडताळणी झाल्याशिवाय व त्यांना ९० दिवसांचा हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून कार्य केल्याचा अनुभव वैध ठरल्यानंतरच त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२) उमेदवाराने संबंधित पदाकरीता विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव जाहिरातीच्या दिनांकापूर्वी धारण करणे अनिवार्य राहिल. ऑनलाईन परिक्षा ही उमेदवारांच्या कोणत्याही प्रमाणपत्रांची तपासणी न करता घेतली जाणार असल्याने या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पूर्ण छाननी नंतर उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे व शासनाने विहित केलेल्या नियमानुसार सामाजिक/ समांतर आरक्षण निहाय निवड केली जाईल. उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली परिक्षा शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही.

सरळसेवा भरती प्रक्रियासंदर्भातील सविस्तर जाहिरात आरोग्य विभागाच्या http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरिता केवळ www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व परीक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अदयावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

## ३) कमाल व किमान वयोमर्यादा :-

- उमेदवाराचे वय जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिवशी किमान १८ वर्षे पुर्ण असावे. खुल्या संवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहिल. अगोदरच शासन सेवेत असणाऱ्यांना नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी ज्या पदांकरीता काही वर्षांचा अनुभव आवश्यक आहे अशा पदांकरीता सेवा प्रवेश नियमात कमाल वयोमर्यादा + अनुभवाचा कालावधी इतपत किंवा पदाच्या विशेषज्ञतेनूसार व आवश्यकतेनूसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहिल.
- अपंग प्रवर्गातील / प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / स्वातंत्र्य सैनिकांची नामनिर्देशित पाल्य / सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ चे निवडणुक कर्मचारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहिल.

- सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.आरटीए१०७९/०/४८२/एक्सव्हीआय-ए, दि.१६/४/१९८१ व शासन शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ,दि.२०/८/२०१० अन्वये माजी सैनिकांना विहित वयोमर्यादा राहील.
- खेळाडू या प्रवर्गाकरिता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहिल .
- सुशिक्षीत बेराजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकिय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदविधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना वयोमर्यादा ५५ वर्षे इतकी राहिल.
- अनाथ मुलांकरिता (उमेदवारांकरिता) शासन निर्णय-क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दि.०२/०४/२०१८ नुसार आरक्षण विहित करण्यात आलेले आहे.
- सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.६२ मधिल नियम ४ (२) अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गाला राखीव जागांच्या प्रयोजनाकरीता आरक्षणाच्या प्रयोजनासाठी उन्नत व प्रगत गटाचे तत्व लागू असेल आणि ज्या कोणी व्यक्ती उन्नत व प्रगत गटाखालील असतील त्यांनाच फक्त या अधिनियमाअन्वये आरक्षण उपलब्ध असेल.
- सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२/०२/२०१९ अन्वये खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता नियुक्तीसाठी सरळसेवेच्या पदांमध्ये १० टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

४) **मराठी भाषेचे ज्ञान :-**

अ) उमेदवाराला मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील.
ब) उमेदवाराला नियमानुसार मराठी व हिंदी भाषेच्या परीक्षा, त्याने अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील तर निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५) **भरती प्रक्रिया शुल्क :-**

सदर भरती प्रक्रियेत खालीप्रमाणे शुल्क आकारले जाणार असून, सदर परीक्षा शुल्क हे ना-परतावा राहील.

| | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| १) लेखी परीक्षा/व्यावसायीक चाचणी परीक्षा | रु.५००/- | रु.३००/- |

२) माजी सैनिकांना आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.

६) **ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

| **अर्ज भरण्याची कार्यपद्धती आणि सुचना :-** | |
|---|---|
| 1) | उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या 'सूचना' या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. .( Activation लिंक ही २ दिवसांकरिता activate असेल.). उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल<br>टीप : USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल . |

| | |
|---|---|
| 2) | उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. |
| 3) | छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी 200 pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची 60 पिक्सल आणि रुंदी 140 पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान 3 KB ते 50 KB च्या दरम्यान असावे. (टिप :- उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे .) |
| 4) | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ.सहित माहिती भरावी. |
| 5) | त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने / तिने आपला जात प्रवर्ग निवडावा.<br><br>उमेदवार जर ST प्रवर्गात मोडत असेल तर त्यास तो ST-PESA प्रवर्गामध्ये अर्ज करू इच्छितो का नाही याची निवड करावी लागेल. उमेदवारास ST -PESA साठी अर्ज करावयाचा असल्यास त्याच्याकडे स्वत: किंवा त्यांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा संबंधित जिल्हयाच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये दि.26 जानेवारी 1950 पासून सातत्याने वास्तव्य करीत आहेत यासंबंधीचा महसुली पुरावा असणे आवश्यक आहे. ( फक्त बहुउददेशिय आरोग्य कर्मचारी ५०%, बहुउददेशिय आरोग्य कर्मचारी ४०% यांसाठी) |
| 6) | ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/ आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी . समांतर आरक्षण (लागू असल्यास) त्यासंबंधीची माहिती द्यावी लागेल . |
| 7) | तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास ) यासंबंधीची माहिती द्यावी लागेल. |
| 8) | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल. |
| 9) | एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदार पुढे या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| 10) | आता उमेदवारास पदाची निवड करावी लागेल.<br><br>उमेदवार एकाच अर्जामध्ये पात्र असलेल्या (जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रता, वयाची अर्हता आणि अन्य अर्हता विचारात घेऊन ) सर्व पदांना (इच्छुक असल्यास) अर्ज करू शकतो, त्यामुळे पदानुसार वेगळा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. |
| 11) | उमेदवारास निवड केलेल्या प्रत्येक पदासाठी आपण अर्ज करू इच्छित असलेल्या कार्यालयाची निवड करावी लागेल. कृपया पदानुसार कार्यालयाची निवड करण्याआधी जाहिरात वाचावी, येथे यादीमध्ये निवड करण्यासाठी |

| | |
|---|---|
| | उपलब्ध असलेले कार्यालये ही जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे रिक्त पदांचा विचार करून दाखवण्यात आलेले आहेत.<br>त्यानंतर उमेदवारास सर्व पदांसाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे. |

| Sr. No. | पदाचे नाव इंग्रजीमध्ये | पदाचे नाव मराठीमध्ये |
|---|---|---|
| 26 | Multi-Purpose Health Worker 50% | बहुउददेशिय आरोग्य कर्मचारी ५०% |
| 27 | Multi-Purpose Health Worker 40% | बहुउददेशिय आरोग्य कर्मचारी ४०% |

| | |
|---|---|
| 12) | उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंतीक्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांची निवड करणे आवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकीएकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास , उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल. |
| 13) | उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने (इंटरनेट बँकिंग , क्रेडिट कार्ड /डेबिट कार्ड , भीम UPI ) आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल. |
| 14) | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री 12.00 वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल. |
| 15) | जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर 18003000 7766 वर कॉल करा.<br>**नोंद :-** नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण) , पसंतीचे स्थान, जन्मतारीख उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| **अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन:-** | |
| 1) | युजरनेम आणि पासवर्ड वापरून लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो. |
| 2) | अर्ज प्रिंट करण्यासाठी **"प्रिंट प्रिव्हयू"** या पर्यायावर क्लिक करा.<br>नोंद :उमेदवाराने आपला PDF स्वरूपातील अर्ज, परीक्षा प्रवेश पत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत स्वतः जवळ ठेवावा. |
| **महत्त्वाच्या सूचना:** | |
| | १) उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही. |

| | |
|---|---|
| | २) परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.<br>३) उमेदवार जे वेगवेगळे विभाग/ वेगवेगळ्या पदांसाठी अर्ज करत असतील, अशा उमेदवारांनी सर्व विभाग /पदे यांकरिता सारखी परीक्षा शहरांची निवड करावी . अन्यथा वेगवेगळ्या पदांसाठीच्या परीक्षेसाठी वेगवेगळे परीक्षा केंद्र /शहर मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>४) उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंतीक्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांची निवड करणे आवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी जवळील परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल.<br>५) उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज केलेलं आहेत असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.<br>६) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही . |

८) **परीक्षेचे स्वरुप :-**

**सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं.:- प्रानिमं१२१६/प्र.क्रं.(६५/१६)/१३-अ दिनांक १३ जून २०१८ अन्वये परीक्षेचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.**

१) गट क पदांकरिता २०० गुणांची संगणकीकृत पध्दतीने परिक्षा घेण्यात येईल.
२) सदर परीक्षेच्या प्रश्नपत्रीका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रश्नपत्रीकेतील प्रत्येक प्रश्नास जास्तीत जास्त ०२ गुण ठेवण्यात येतील.
३) वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपीक या पदांसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण या प्रमाणे २०० गुणांची प्रश्नपत्रीका राहील.
४) तांत्रीक संवर्गातील पदाकरिता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ३० गुण या प्रमाणे १२० गुणांची व ८० गुण विषयाधारीत प्रश्न अशी एकूण २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल.
५) वाहनचालक या पदाकरिता लेखी परिक्षा २०० गुणांची व व्यावसायिक चाचणी ४० गुणांची घेण्यात येईल.
६) गट क संवर्गातील पदांकरिता परीक्षेचा कालावधी २.०० तासाचा राहील.
७) विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयांमधील एका संवर्गाची परीक्षा ही संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी होणार असल्याने उमेदवारांनी कोणत्या कार्यालयाकरिता अर्ज करावा ही उमेदवाराची निवड राहील.

९) **निवड पध्दत :**

१) उमेदवारांची निवड लेखी परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आधारे गुणानुक्रमे करण्यात येईल.
२) उमेदवाराने परीक्षेच्या एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. अशाच उमेदवारांना निवडसूची बनविताना पात्र ठरविण्यात येईल.
३) परीक्षेचा निकाल तयार करताना त्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन क्रमांक प्रानिमं-१२१६/(प्र.क्र.६५/१६)/१३-अ, दिनांक १३/०६/२०१८ मधील निकषावर लावला जाईल.
४) शासन परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६ मार्च,१९९९ तसेच शासन परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनाक १३ ऑगष्ट, २०१४ व शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण.१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दि.१९.१२.२०१८ मधील तरतुदीनूसार समांतर आरक्षण कार्यान्वीत करण्यासाठी विहित केलेली कार्यपध्दती अनुसरली जाईल.
५) भरतीच्या अनुषंगाने शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय लागू राहतील.

१०) **सर्वसाधारण अटी :-**

१) पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवू नये. तसेच यापुर्वी आरोग्य विभागाकडे नोकरीकरिता केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

२) परिक्षेची तारीख व रुपरेषा प्रकल्प व्यवस्थापक, महापरिक्षा पोर्टल यांचे www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर व आरोग्य विभागाच्या http://arogya.maharashtra.gov.in या संकतेस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३) उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाव्दारे स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची काळजी घ्यावी.

४) परिक्षेतील गुणानुक्रम व आरक्षण विचारात घेऊन पात्र झालेल्या उमेदवारांची नावे प्रकल्प व्यवस्थापक, महापरिक्षा पोर्टल यांचे www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर व आरोग्य विभागाच्या http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

५) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरताना संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचून योग्य प्रकारे अर्ज करावा. अर्ज भरताना अर्जदाराने आवश्यक सर्व तपशील स्वतः जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी. अर्ज सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही, याची उमेदवाराने नोंद घ्यावी. अर्जातील तपशिल चुकीचा भरल्याबाबत उमेदवार स्वतः जबाबदार असल्याने याबाबत कुठलाही दावा ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी. परिक्षा ही उमेदवारांच्या कोणत्याही कागदपत्रांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतर व कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर सामाजिक व समांतर आरक्षणानुसार अंतिम निवड/नियुक्ती करण्यात येईल.

६) ज्या उमेदवारांनी जिल्हा सेवायोजन कार्यालय, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालये, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अथवा अन्य शासकिय कार्यालयात नांव नोंदणी केली असेल त्यांनी देखील ते इच्छुक व पात्र असल्यास विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

७) उमेदवाराचा अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहिल. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्ज भरतांना खोटी किंवा विसंगत/दिशाभुल माहिती भरल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत उमेदवारास अपात्र ठरविण्यांत येईल.

८) उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवंलब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था आढळल्यास किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्र/कागदपत्रे कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनांस आल्यास त्याची/तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

९) उमेदवारांना परिक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१०) परिक्षेच्या वेळी परिक्षा कक्षामध्ये भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

११) शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याची परवानगी घेऊन तसा अर्ज करावा. निवड झालेल्या उमेदवारांना सदर पत्राची प्रत प्रमाणपत्र तपासणीवेळी सादर करावी लागेल.

१२) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे). उपरोक्त बाबत शासनाने वेळोवेळी विहित केलेले सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

१३) महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, निराधीसुचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग, यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासुन अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांना लागु आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे **अद्ययावत** वैध असलेले (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१४) महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक ८२/२००१/मसेआ-२००/प्र.क्र. ४१५/का.२, दि.२५ मे २००१ मधील तरतुदीनुसार राहिल. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे **अद्ययावत** वैध असलेले (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१५) शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआव्ही-२०००/प्र.क्र.१७(२०००)/१२, दिनांक २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १ जुलै २००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या नमुन्यातील प्रतिज्ञापत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहीत उमेदवारांनी "लागु नाही" असे नमुद करुन स्वतःची स्वाक्षरी करावी)

१६) सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ब, दि.१२/१२/२०११ नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्तीच्या दिनांकापासुन ६ महिन्यांच्या आंत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधीत जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

१७) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गातील (ईएसबीसी) वर्गातील उमेदवारांकरिता शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी १०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दि.०७/१२/२०१८ अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी १०/२०१३/प्र.क्र. ३५/मावक, दि.१५/०७/२०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिक दृष्टया मागासवर्गाकरिता (ईएसबीसी) देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे इतर मागास वर्गासाठी असलेल्या जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याच्या कार्यपध्दतीसारखीच राहील.

१८) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/०३/२००३ नुसार गट-क संवर्गातील उमेदवारांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन २ वर्षाचे आत शासनाने ठरवुन दिलेली संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

१९) परिक्षेमध्ये गुणवत्ता यादीत येणा-या उमेदवारांना त्यांचे पदासाठी आवश्यक असणारे कागदपत्रे पडताळणीच्या वेळी केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी/पोस्टमास्टर/मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकारी यांचेकडून साक्षांकित करुन किंवा स्वसाक्षांकीत प्रती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

- शैक्षणिक/व्यावसायीक/तांत्रिक अर्हता प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
- जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र
- वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्माचा दाखला किंवा माध्यमिक शालांत परिक्षेचे प्रमाणपत्र.
- उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमेलीअर) सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र.
- रहिवासी प्रमाणपत्र

- संगणक हाताळणी अर्हता प्रमाणपत्र.
- जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी क्रमांक.
- प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन / अतिउच्च गुणवत्ता धारण खेळाडू प्रमाणपत्र/माजी सैनिक/स्वातंत्र्यसैनिकांचे नामनिर्देशित पाल्य असल्यास उमेदवारांचे नांवे सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले प्रमाणपत्र.
- अपंग उमेदवारांच्या बाबतीत जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकीय मंडळाचे किमान ४० टक्के अपंगत्व असल्याचे प्रमाणपत्र.
- शासकिय/निमशासकिय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभाग प्रमुखाच्या परवानगीने भरला असल्यास अशा परवानगीचे पत्र.
- इतर आवश्यक ते कागदपत्रे.

२०) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.राक्रीधो-१-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.०१/०७/२०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्र.राक्रीधो-१-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१०/१०/२०१७ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडूबाबत आरक्षण, क्रीडा विषयक प्रमाणपत्र पडताळणी तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि.२७.१०.२००९ अन्वये पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना "सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य" या योजनेअंतर्गत शासकिय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले पाहिजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. अशा मानधनावर काम केलेल्या अंशकालीन पदवीधर / पदविकाधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयात नोंदणी असणे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र कागदपत्राच्या तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.

२२) स्वातंत्र्यसैनिक नामनिर्देशित पाल्यांनी जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहिल.

२३) अपंग आरक्षणातून लाभ घेणा-या उमेदवारांनी किमान ४० टक्के अपंग असलेबाबत जिल्हा शल्य चिकित्सक अथवा वैद्यकिय मंडळाने दिलेले वैद्यकिय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच अपंग आरक्षणातून निवड झालेल्या उमेदवारांना शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकिय मंडळाने तो उमेदवार निवड केलेल्या पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यावरच नियुक्ती देण्यांत येईल. अपंग उमेदवारांना लेखनिकाची आवश्यकता असल्यास तसेच अर्जात नमुद करावे.

२४) प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य व अंशकालीन उमेदवाराच्या प्रमाणपत्रांची संबंधीत जिल्हयातील जिल्हाधिकारी/जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडुन प्रत्यक्ष पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यांत येणार नाही.

२५) गुणवत्ता यादीमध्ये येणा-या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नांव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत व इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिका-याकडुन पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यांत येणार नाही.

२६) अंतिमरित्या निवड केलेल्या उमेदवारांना शासन निर्णय क्र.अनियो १००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५ नुसार नविन परिभाषिक अंशदान निवृत्ती योजना लागु होईल. सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु राहणार नाही.

२७) पदाच्या संख्येत / आरक्षणांत वाढ अथवा घट होवू शकते. परिक्षेचा प्रकार, पदाची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे वा रद्द करणे आणि अंशतः बदल करणे

याबाबतचे सर्व अधिकार नियुक्ती प्राधिकारी स्वतःकडे राखुन ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२८) सदर जाहिरातीत काही संभ्रम असल्यास आरोग्य विभागाच्या http://mahaarogya.gov.in या संकेतस्थळावरील व महापरीक्षा पोर्टलच्या www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावरील जाहिरात ही अधिकृत समजण्यांत येईल.

२९) **जाहिरातीतील कोणतेही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास, शासन निर्णय अंतिम राहिल.**

३०) सदर भरती प्रक्रिया पुर्णतः वा अंशतः रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी राखुन ठेवत आहेत.

३१) जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता व अनुभव किमान अर्हता व अनुभव दर्शवितात.

३२) नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा अन्य कारणास्तव विहित दिनांकास परिक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल. त्याप्रमाणे सोईच्या दिवशी परिक्षा घेणेत येईल. याबाबत सर्व उमेदवारांना वर्तमान पत्रातुन जाहिरातीव्दारे अथवा http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व www.mahapariksha.gov.in चे संकेत स्थळावरुन कळविण्यांत येईल.

३३) या जाहिरातीमध्ये नमुद केलेले सर्व शासन निर्णय व परिपत्रके महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

जिल्हा हिवताप अधिकारी,
गडचिरोली.

ठिकाण - गडचिरोली.
दिनांक - २२/०२/२०१९